आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२३ एप्रिल २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम हल्ल्यानंतर राज्यातल्या पर्यटकांना सुरक्षित परत आणण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलं सतर्क, हल्लेखोरांचा शोध जारी

- काश्मीरमधे अडकलेल्या पर्यटकांसाठी विशेष विमानांची व्यवस्था

- पुण्याची एफ.टी.आय.आय.आणि कोलकत्याची सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था यांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान

**आणि**

- आयएसएसएफ नेमबाजी स्पर्धेत भारत सात पदकं जिंकून तिसऱ्या स्थानावर

**<><><><><>**

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात राज्यातल्या एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह राज्यात परत आणण्यात येत आहेत. मृतांच्या कुटुंबांना राज्यशासनानं प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काश्मीरमधे अडकलेल्या पर्यटकांना सुखरुप राज्यात परत आणण्याला शासनाचं प्राधान्य राहील असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. या हल्ल्याचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध केला.

**होल्ड- बाईट- फडणवीस**

डोंबिवलीचे संजय लेले, हेमंत जोशी आणि अतुल मोने, पुण्याचे कौस्तुभ गणवते आणि संतोष जगदाळे तसंच नवी मुंबईचे दिलीप डिसले या पर्यटकांचा या हल्ल्यात मृत्यू झाला. महसूलमंत्री गिरीश महाजन श्रीनगरसाठी रवाना होत असून इतर

पर्यटकांना परत आणण्यासाठी व्यवस्था करण्यात येत असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

जम्मू काश्मीर सरकारने मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि गंभीर रीत्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून राज्यातल्या पर्यटकांच्या सुरक्षित परतीसाठी वचनबद्धता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरच्या विविध भागात अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने हेल्पलाईन सुरू केली आहे. हा मदत कक्ष चोवीस तास सुरू राहणार असून पर्यटक किंवा त्यांच्या नातेवाईकांनी ०२२-२२०२७९९० या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन राज्य शासनाने केलं आहे. श्रीनगर जिल्हा प्रशासनानेही पर्यटकांना आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधता यावा यासाठी मदत कक्ष स्थापन केला असून ०१९४-२४८३६५१, ०१९४-२४६३६५१, ०१९४-२४५७५४३ या क्रमाकांवर संपर्क करायचं आवाहन केलं आहे. तसंच, ७००६०५८६२३, ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७ या क्रमांकांवर व्हॉट्सॲप संदेश पाठवण्याचं आवाहनही शासनाने केलं आहे.

**<><><><><>**

या हल्ल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा सोडून भारतात परतले आहेत. आल्यानंतर त्यांनी विमानतळावरच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नायब राज्यपाल मनोज सिन्हा , जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पहलगाम  दहशतवादी हल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना पुष्पांजली अर्पण केली. शहा यांनी मृतांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांचं सांत्वन केलं. यानंतर गृहमंत्र्यांनी पहलगामजवळ बैसरन इथं प्रत्यक्ष हल्ल्याच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत काश्मीर खोऱ्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना स्थितीची माहिती दिली. हल्ला झालेल्या परिसरात सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवण्यात आलं आहे. परिसरात शोधमोहीम राबवण्यासाठी सैन्याचे जवान तैनात करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेच्या द रेझिस्टन्स फ्रंट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी घेतली असून हल्ल्याच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी शोधमोहीम तीव्र केली आहे. संशयित दहशतवाद्यांची रेखाचित्रं तयार करुन सर्वत्र कसून शोध घेण्यात येत आहे. पर्यटकांवर हल्ला झाल्याच्या निषेधार्थ जम्मू काश्मीरमधे आज बंद पाळण्यात येत आहे. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांतर्फे या हल्ल्याच्या निषेधात शांततापूर्ण निदर्शन करण्यात येत आहेत. राज्यात अनेक ठिकाणी या हल्ल्याचा निषेध करणारी निदर्शनं झाली.

**<><><><><>**

पहलगाम इथे काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी विमान कंपन्यांबरोबर तातडीची बैठक घेतली. विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी राखण्याचे निर्देश देण्यात आले

आहेत. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही नायडू यांनी विमान कंपन्यांना दिले. दिल्ली आणि मुंबईसाठी प्रत्येकी दोन अशा चार उड्डाणांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांसाठी एअर इंडिया आणि इंडिगो या विमान कंपन्यांनी उड्डाणांची संख्या वाढवल्याची माहिती समाजमाध्यमावर दिली आहे. तिकीट आरक्षित असलेल्या प्रवाशांना तिकिटात सवलत तसंच, वेळापत्रकात बदल झाल्यानंतर होणारा अतिरिक्त खर्चही घेण्यात आलेला नाही. तिकीटं रद्द करणाऱ्या प्रवाशांना रकमेची परतफेडही करण्यात येत आहे. महाराष्ट्रातले अनेक पर्यटक अजूनही जम्मू आणि काश्मीरमध्ये अडकल्याची शक्यता असल्यानं त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्याची विनंती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारकडे केली.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या जगभरातल्या नेत्यांनी तीव्र निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याचा निषेध करत दहशतवादाविरोधातल्या लढाईत अमेरिका भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली आणि या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला.

ब्रिटनचे प्रधानमंत्री केअर स्टार्मर, जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ, डेन्मार्कच्या प्रधानमंत्री मेटे फ्रेडरिकसेन, इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांनीही या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे.

युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनीही या संकटात युरोप भारतासोबत खंबीरपणे उभा असल्याचं म्हटलं आहे.

गयानाचे राष्ट्राध्यक्ष इरफान अली, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज, न्यूझीलंडचे परराष्ट्र व्यवहार मंत्री विन्स्टन पीटर्स यांनी या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे. भारतातल्या युक्रेन दूतावासानं या हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व राजकीय पक्षांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी म्हटलंय की हा हल्ला शोकाकुल करणारा असून सारा देश दहशतवादाच्या विरोधात एकवटला आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात काँग्रेस पक्षाचा सरकारला पूर्ण पाठिंबा आणि सहकार्य राहील असं पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैद्राबाद आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान हैद्राबाद इथे सामना खेळला जाणार आहे. लखनौ इथे काल झालेल्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना लखनौच्या सुपर जायंट्स संघाने ६ गडी बाद १५९ धावा केल्या. दिल्ली कॅपिटल संघाने २ गड्यांच्या मोबदल्यात १६१ धावा करुन सामना जिंकला.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं पुणे इथली भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान केला आहे. या संदर्भातली अधिसूचना शिक्षण मंत्रालयानं काल जारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगानं केलेल्या शिफारशीनुसार या दोन्ही संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला गेल्याचं अधिसूचनेत म्हटलं आहे. या निर्णयामुळे या दोन्ही संस्थांना आता

विद्यापीठ अनुदान आयोग आणि नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार डॉक्टरेट, संशोधन आणि नवोन्मेषी शैक्षणिक अभ्यासक्रम आणि उपक्रम राबवता येतील. याशिवाय आता या दोन्ही संस्थांचा राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा तसंच शैक्षणिक श्रेण्यांक पेढी अर्थात अकॅडमिक बँक ऑफ क्रिडिटमध्ये समावेश केला जाणार आहे. हा निर्णय नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असून, त्यामुळे स्वायत्तता, नवोन्मेष तसंच चित्रपट आणि माध्यम विषयक शिक्षण क्षेत्रातल्या उत्कृष्टतेचा मार्ग अधिक प्रशस्त होणार असल्याचं मंत्रालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

आयएसएसएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघानं आयोजित केलेल्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं सात पदकं जिंकत तिसरं स्थान पटकावलं आहे. यात दोन सुवर्ण, चार रौप्य आणि एका कांस्य पदकाचा समावेश आहे.

**//<><><><><>//**